**स्वर प्रतिरोधाचा**

# आता ठरवा, तुम्ही कोणत्या बाजूला आहात?

मेघा पानसरे

२० फेब्रुवारी २०१८. कॉम्रेड पानसरेंच्या खुनानंतर तीन वर्षे उलटली. अजूनही ती सकाळ, हिंसेचा प्रत्यक्ष थरार जसाच्या तसा आठवतो. घरासमोरच रस्त्याकडेला हात जमिनीवर टेकून बसलेल्या, प्रचंड वेदना आणि रक्तस्राव होत असूनही काही सांगू पाहणाऱ्या कॉम्रेड पानसरे यांना मी आणि मुलांनी आक्रंदत जवळ घेतले तेव्हाचा त्यांच्या हाताचा उष्ण स्पर्श अजूनही जाणवतो. त्यानंतर सुरू झालेली कटू अनुभवांची मालिकाही अजून संपलेली नाही. खुन्यांना शिक्षा मिळावी यासाठी लोकशाही व्यवस्थेत न्यायालयीन स्तरावर शक्य ते सर्व प्रयत्न करणे ही योग्यच बाब आहे. पण त्याला न्याय म्हणता येईल का आणि तो खरेच मिळणार का असे अनेक प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत. पण गेल्या तीन वर्षात कुटुंबातील जवळच्या व्यक्तीच्या हिंसेच्या अनुभवापासून एका व्यापक, सामूहिक वैचारिक व राजकीय लढाईच्या दिशेने झालेला प्रवास विनातक्रार स्वीकारणे आज विवेकी ठरते.

विवेकवाद्यांच्या खुनांचा निषेध आणि न्यायासाठी आंदोलने अजून थांबलेली नाहीत. देशभरात सतत कुठे ना कुठे विविध स्तरांवर, विविध मंचांवर हे खून आणि विवेकवादावरील संकट यावर गांभीर्याने बोलले जात आहे. लोकशाही मूल्यांची जपणूक करू इच्छिणारे लोक एकत्र येत आहेत. असं म्हणतात की साहित्यिक, बुद्धिजीवींना समाजात चाललेल्या खळबळीचा वेध घेता येतो. भविष्यातील संकटे आणि संभाव्य उद्रेकाचा अंदाज येतो. म्हणूनच प्रा. कलबुर्गींच्या खुनानंतर ते जाहीरपणे आपली अस्वस्थता, उद्वेग व्यक्त करू लागले. पुरस्कार वापसीचे उत्स्फूर्त आंदोलन हा देशातील असहमतीच्या भावनेचा प्रकट आविष्कार होता. अलीकडे 'नॉट इन माय नेम' यासारखी आंदोलनेही झाली. ही एक सामाजिक-राजकीय प्रक्रिया आहे. ती नक्कीच विकसित होत राहील आणि गतिमान होत अखेरीस आर या पार संघर्षापर्यंत जाऊन धडकेल.

गेल्या काही वर्षांत धर्मांधतेच्या विरोधातील, सांस्कृतिक विविधता आणि बहुलतावादाचा पुरस्कार करणारे पत्रकार, साहित्यिक-कवी, वैज्ञानिक यांना धमक्या, हल्ले आणि खूनांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. सामाजिक माध्यमांतून नियोजनपूर्वक ट्रोलिंग होते आहे. जात, धर्म, वंश, भाषा अशा मुद्द्यांवर आधारित विद्वेष पसरवण्याचे कामही मोठ्या प्रमाणावर चालू आहे. संघ परिवार आणि भाजपचे पदाधिकारी, मंत्री जाहीरपणे संविधान विरोधी वक्तव्ये करत आहेत.

लेखिका शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे रशियन भाषेच्या अध्यापक आहेत
इमेल megha.pnsr@gmail.com

विशेष म्हणजे हे सारे राष्ट्रवादाच्या नावाखाली केले जात आहे. एका बाजूला मानववंशशास्त्रज्ञ हे ठामपणे सांगताहेत की, आज जगातील कोणताही वंश स्वत:ला विशुद्ध मानू शकत नाही. तर दुसऱ्या बाजूला 'शुद्ध हिंदुत्वाचा नारा' हे एक राजकीय अस्त्र बनले आहे. भौगोलिक एकात्मता, वंश, धर्म, भाषा, संस्कृती यावर आधारित ऐक्य आणि सामायिक इतिहास या सर्व अटी पूर्ण करणारे एकही राष्ट्र आज या पृथ्वीतलावर अस्तित्त्वात नाही. स्थलांतर, युद्धातील जय-पराजय, वसाहतवाद यामुळे सर्वच राष्ट्रे मिश्र वंशीय बनली आहेत.

भौगोलिक, आर्थिक ऐक्य आणि सामायिक इतिहास हे राष्ट्र म्हणून भारतीय लोकांना जोडणारे घटक आहेत. विशेषत: हजारो वर्षांचा सामायिक इतिहास हा आपला सर्वात दृढ, सामर्थ्यशाली बंध आहे. गेल्या दहा हजार वर्षांत या भूमीवर मध्य व पश्चिम आशिया, पश्चिम युरेशिया, तिबेट-बर्मा अशा विविध प्रदेशांतून आर्य, मंगोलियन, कुशन, शक, ग्रीक, हूण, अरब, पर्शियन, तुर्क अशा वंशांचे लोक स्थलांतरित होऊन आले. स्थिर झाले. इथल्या लोकांत मिसळून गेले. गेल्या हजार वर्षांत इथे संत आणि सुफींनी सहिष्णुता, सुसंवाद आणि सामंजस्याचे वातावरण निर्माण केले. जेव्हा हिंदू आणि मुस्लीम राजे सत्तेसाठी लढत होते तेव्हा सर्वसामान्य लोक गुण्यागोविंदाने राहत होते. इतिहासात कधी शासक असलेले इथले मुस्लीम हिंदूंप्रमाणेच वसाहतवादी ब्रिटिश सत्तेच्या शोषणाचे बळी होते. तेही स्वातंत्र्य लढ्यात उतरले, हे लक्षात घेतले पाहिजे. कबीर, गुरू नानक, अकबर, भक्ती व सूफी चळवळ, उर्दू भाषा, अमीर खुस्रो, मिर्जा गालिब, तत्त्वज्ञान, चित्रकला, वास्तुशिल्प, संगीत, पाककला, पेहराव, उत्सव यावरील परस्पर प्रभाव, गंगा-जमुना संस्कृती हा आपला एक सशक्त वारसा आहे. म्हणूनच तर देशाची फाळणी रोखण्यात अपयश आल्याची प्रचंड वेदना असूनही आपल्या नेत्यांनी धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक निर्माण करण्याचा निर्णय घेतला. तसे संविधान बनवले. धर्म आणि राज्यसंस्था यांची फारकत केली. कलम २९ नुसार अल्पसंख्याकांना संरक्षण दिले.

या देशाने मुस्लीम, शीख आणि ख्रिश्चन धर्मातील अतिरेकी, कट्टरतावादी पाहिले आहेत. १९४७ची फाळणी, काश्मीर, खलिस्तान, नक्षलवाद, ईशान्येकडील राज्यांतील सशस्त्र, हिंसक आंदोलनांत अनेक तरुण सहभागी झाल्याचे आपण पाहिले. त्यांच्या प्रश्नाकडे जसे देशाच्या अखंडतेचे-एकात्मतेचे रक्षण, कायदा व सुव्यवस्था या दृष्टिकोनातून पहिले गेले, तसेच मानवतेच्या दृष्टिकोनातूनही पाहणे आवश्यक होते. तसे पाहण्याचे प्रयत्नही काही अंशी झाले. हिंसेने प्रश्न सुटत नाहीत, हे वास्तवही समोर आले. परंतु समाजातील बहुसंख्य हिंदू जेव्हा जमातवादी, विद्वेषी भावना भडकवून-भडकून हिंसक बनतात तेव्हा मानवता, करुणा विरून जाते. याचे दाहक अनुभव देशातील विवेकवादी आणि निरपराधी अल्पसंख्यांक, दलित, स्त्रिया घेत आहेत. असंख्य मोहसीन, जुनैद, अखलाक, तसेच उनाप्रमाणेच इतर प्रदेशातील दलित बांधव आणि स्त्रिया हिंसेचे बळी ठरत आहेत. गोरक्षणाच्या नावाखाली झालेल्या हिंसेतील ८२% बळी मुस्लीम होते, पण १८% हिंदूही होते. सनल इडामारुकुसारखा विवेकवादी लेखक जीव धोक्यात असल्याने फिनलँडमध्ये आश्रित म्हणून राहत आहे.

आता हा केवळ सत्ताधारी शासनाच्या विचारप्रणालीला विरोध करण्याचे साहस करणाऱ्या लोकांच्या खुनांचा प्रश्न राहिला नाही. दाभोलकर-पानसरे-कलबुर्गी आणि गौरी ज्यांचे रक्षण करू पाहत होते ती संविधानिक मुल्ये, धर्मनिरपेक्ष विचारप्रणाली आणि लोकशाही रचना यावर हा हल्ला आहे. या देशाला हिंदू धर्माधारित राष्ट्र बनवण्याच्या संघ परिवाराच्या राजकीय उद्दिष्टाविरुद्ध ते उभे होते. लोकांना विचार करायला, प्रश्न विचारायला आणि स्वत:ची असहमती व्यक्त करायला प्रोत्साहन देत होते. त्यामुळे त्यांचे खून हे सरळसरळ राजकीय खून आहेत, अशी स्पष्ट भूमिका आता सर्व विवेकी, हिंसेला विरोध

करणाऱ्या लोकांनी घेतली पाहिजे.

गांधीजींच्या खुनानंतर भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी श्यामा प्रसाद मुखर्जी यांना लिहिलेल्या पत्रातील मजकूर आजही तितकाच प्रस्तुत आहे. ते लिहितात, 'आर.एस.एस. आणि हिंदू महासभा यांच्या बाबतीत आमचे अहवाल खात्रीशीरपणे सांगतात की या दोन संघटनांच्या, खास करून आर.एस.एस.च्या कृतींच्या परिणामी देशात असे वातावरण निर्माण केले गेले होते की अशा प्रकारची भीषण शोकांतिका शक्य झाली.' (१८ जुलै, १९४८. संदर्भ- सरदार पटेल पत्रव्यवहार, खंड ६, संपादक दुर्गा दास)

सुप्रसिद्ध हिंदी कवी सर्वेश्वर दयाल सक्सेना यांची कविता देश काग़ज़ पर बना नक्शा नहीं होता... मधील काही पंक्ती आजच्या अस्वस्थ, हिंसात्मक वर्तमानात जगणाऱ्या सर्वच संवेदनशील माणसांसाठी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करतात.

यदि तुम्हारे घर के एक कमरे में आग लगी हो
तो क्या तुम दूसरे कमरे में सो सकते हो?
यदि तुम्हारे घर के एक कमरे में लाशें सड़ रहीं हों
तो क्या तुम दूसरे कमरे में प्रार्थना कर सकते हो?

आपल्यासमोरही आज हाच प्रश्न आहे. विद्वेष आणि हिंसेचा गंध भरलेल्या भवतालात आपण शांतपणे श्वास घेऊ शकतो? व्यक्ती म्हणून सुखाने जगू शकतो? हिंसा की मानवता, विद्वेष की प्रेम आणि करुणा, अंधश्रद्धा की विवेक? आपल्या पुढच्या पिढीला आपण बहुरंगी सांस्कृतिक जीवन देणार आहोत की एकरंगी जगणं? लोकशाही की हिंदू पाकिस्तान? यात निवड करायलाच हवी.

कवी बल्ली सिंह चीमा यांच्या शैलीत विचारायचे तर,

तय करो किस ओर हो तुम, तय करो किस ओर हो।
आदमी के पक्ष में हो, या कि आदमखोर हो।।...
इससे पहले युद्ध शुरू हो, तय करो किस ओर हो।
तय करो किस ओर हो तुम, तय करो किस ओर हो।।

●


परिवर्तनाचा
वाटसरू

**परिवर्तनाचा वाटसरूची वर्गणी**
**बँक ट्रान्सफरने भरण्यासाठी तपशील**

बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे
बचत खाते : **परिवर्तनाचा वाटसरू**
बचत खाते क्र. : 051410110013969
आयएफएससी क्र. : BKID0000514
एमआयसीआर क्र. : 411013014

**पैसे ट्रान्सफर केल्यानंतर ७७७६९०२२६७ या क्रमांकावर एसएमएस द्वारे अथवा pwatsaru@yahoo.com या ईमेलवर कळवावे.**